कार्यालय पोलीस उप अधिक्षक, लाच लुचपत प्रतिबंधक विभाग, जालना

टोल फ्री क्रमांक 1064

कार्यालय दुरध्वनी क्र. :- 02482-220252

**:: प्रेस नोट ::** दिनांक :- 26.02.2021.

**तहसिल कार्यालय अंबड जि.जालना अंतर्गत जामखेड विभागाचे मंडळ अधिकारी श्री.श्रीपाद गंगाधर मोताळे,वय 55 वर्षे,व्यवसाय नोकरी मंडळ अधिकारी,महसुल विभाग जामखेड,तहसिल कार्यालय अंबड जि.जालना. रा.देऊळगाव राजा जि.बुलढाणा,ह.मु.समर्थ नगर प्लॉट क्र.23A जिल्हा परीषदच्या पाठीमागे जुना जालना यास 4,000/- रुपयांची लाच घेतांना लाचलुचपत प्रतिबंधक विभाग जालना च्या पथकाने पकडले**

| | | | |
|---|---|---|---|
| 1 | आरोपीचे नाव, हुद्दा व पत्ता | :- | **1. लोकसेवक श्री.श्रीपाद गंगाधर मोताळे,वय 55 वर्षे,व्यवसाय नोकरी मंडळ अधिकारी,महसुल विभाग जामखेड,तहसिल कार्यालय अंबड जि.जालना.** |
| 2 | गुन्हा घडला तारीख व ठिकाण | :- | दिनांक 26.02.2021 जयभद्रा किराणा स्टोअर,पाचोड,जि.औरंगाबाद येथे |
| 3 | लाचेची रक्कम | :- | 4,000/- रुपये. |

याबाबत हकीगत अशी की, यातील तक्रारदार यांनी दिनांक 26.02.2021 रोजी तक्रार दिली की, मौजे डोणगाव शिवार ता.अंबड जि.जालना येथेली गट क्र.33 मधील शेत जमीनीचा वाटणीपत्राच्या आधारे फेरफार झाला असुन सदर शेतजमीनीचे क्षेत्र विभाणी करण्यासाठी महसुल अधिनियम 1966 चे कलम 85 प्रमाणे क्षेत्र विभागणी करुन देण्यासाठी दिनांक 25/02/2021 रोजी तहसिल कार्यालय अंबड येथे अर्ज दिला.
महसुल विभाग मंडळ अधिकारी जामखेड,तहसिल कार्यालय अंबड जि.जालना यांनी तक्रारदार यांना काल रोजी 10,000/- रुपयांची लाचेची मागणी केली. सदर कामासाठी तक्रारदार यांना लाच देण्याची इच्छा नसल्याने त्यांनी लाचलुचपत प्रतिबंधक विभाग जालना येथे संपर्क साधून तक्रार दिली. सदर तक्रारीवरुन आज दिनांक 26.02.2021 रोजी लाचेची पडताळी करुन सापळा लावला असता 4,000/- हजार रुपये लाचेची मागणी केली. लोकसेवक **श्री.श्रीपाद गंगाधर मोताळे,वय 55 वर्षे,व्यवसाय नोकरी मंडळ अधिकारी,महसुल विभाग जामखेड,तहसिल कार्यालय अंबड जि.जालना.** यांनी स्वत: पंचासमक्ष लाच स्वीकारली असतांना त्यास लाचलुचपत प्रतिबंधक विभाग जालना पथकाने जयभद्रा किराणा स्टोअरच,पाचोड जि.औरंगाबाद येथे रंगेहाथ पकडण्यात आले.

आलोसे **श्री.श्रीपाद गंगाधर मोताळे,वय 55 वर्षे,व्यवसाय नोकरी मंडळ अधिकारी,महसुल विभाग जामखेड,तहसिल कार्यालय अंबड जि.जालना.** यांचे विरुध्द गुन्हा दाखल करण्याबाबत पुढील कार्यवाही चालु आहे.

**तसेच ॲन्टी करप्शन ब्युरो कडुन आवाहन करण्यात येते की, कोणी लोकसेवक शासकीय कामासाठी लाचेची मागणी करीत असल्यास किंवा खाजगी व्यक्ती मार्फत कोणी लाचेची मागणी करीत असल्यास 02482-220252, तसेच टोल फ्री क्रमांक 1064 वर संपर्क करावा. तसेच पोलीस उप अधिक्षक जालना मो.नं. 8975762906, पोलीस निरीक्षक मो.नं. 9823142632, 9767747774 वर संपर्क करावा.**

(एस.एस.शेख )
पोलीस निरीक्षक,
लाचलुचपत प्रतिबंधक विभाग,जालना.